# मिरा भाईंदर महानगरपालिका

उप.आयुक्त (पर्यावरण) यांचे कार्यालय,
जा.क्र.मनपा/उप.आयुक्त/ ३८/२०२२-२३
दि. ०६/०७/२०२२

प्रति,

१) उप-आयुक्त, परिवहन विभाग
२) कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग
३) कार्यकारी अभियंता, विद्युत विभाग
४) सहा-आयुक्त, पर्यावरण विभाग
५) उप-मुख्य उद्यान अधिक्षक (सर्व)
मिरा भाईंदर महानगरपालिका.

**विषय : १५ व्या वित्त आयोगातंर्गत प्राप्त अनुदानातुन "स्वच्छ हवा कृती आराखडा" राबविण्याबाबत गठीत केलेल्या समितीची दि. १५/०६/२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेली बैठक.**

**संदर्भ : १५/०६/२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेल्या बैठकीचे इतिवृत्त.**

उपरोक्त विषयानुसार १५ व्या वित्त आयोगातंर्गत प्राप्त अनुदानातुन "स्वच्छ हवा कृती आराखडा" राबविण्याबाबत गठीत केलेल्या समितीची बैठक दि. १५/०६/२०२२ रोजी आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत १५ व्या वित्त आयोगातंर्गत प्राप्त निधी खर्च करुन हवेची गुणवत्ता सुधारणेकरीता विभागामार्फत करावयाच्या कामकाजाबाबतच्या तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्याची कार्यवाही दि. २५/०७/२०२२ पूर्वी पूर्ण करण्याचे निर्देश मा.आयुक्त महोदयांनी सदर बैठकीत दिलेले आहेत.

तरी सदर बाबत संबंधित विभागांनी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेऊन कामाची निविदा प्रपत्रे तयार करण्याची कार्यवाही तात्काळ पूर्ण करावी. व यासंबंधित आवश्यक त्या परवानग्या पर्यावरण विभागाकडुन घेण्यात याव्यात.

सोबत सदर बैठकीचे इतिवृत्त जोडले आहे.

(संजय शिंदे)
उपायुक्त (पर्यावरण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत माहितीसाठी सविनय सादर,

१. मा.आयुक्त महोदय
२. मा. अतिरिक्त आयुक्त

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**इतिवृत्त**

जा.क्र.मनपा/पर्यावरण/ ३६ /२०२२-२३
दि.०५/०७/२०२२

**विषय : १५ व्या वित्त आयोगातंर्गत प्राप्त अनुदानातुन "स्वच्छ हवा कृती आराखडा" राबविण्याबाबत गठीत केलेल्या समितीची दि. १५/०६/२०२२ रोजी आयोजित करण्यात आलेली बैठक.**

**संदर्भ : १. शासन निर्णय क्र. एफएफसी-२०२२/प्र.क्र.३४/नवि-४, मंत्रालय, मुंबई, दि. २९/०३/२०२२.**
**२. शासन निर्णय क्र. एफएफसी-२०२२/प्र.क्र.५६/नवि-४,मंत्रालय,मुंबई,दि. ०२/०६/२०२२.**

१५ व्या वित्त आयोगातंर्गत प्राप्त अनुदानातुन स्वच्छ हवा कृती आराखडा राबविण्याबाबत गठीत केलेल्या समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालीलप्रमाणे अधिकारी वर्ग उपस्थित होता.

| **अ.क्र.** | **अधिका-यांचे पद** | **समिती** |
|---|---|---|
| १. | श्री. दिलीप ढोले, मा. आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका | अध्यक्ष |
| २. | श्री. सुरेश वाकोडे, अति. शहर अभियंता | सदस्य |
| ३. | श्री. संजय शिंदे, उप-आयुक्त(पर्यावरण) | सदस्य |
| ४. | श्री. रवि पवार उप-आयुक्त (घनकचरा) | सदस्य |
| ५. | श्री. दिपक खांबित, कार्यकारी अभियंता (बांधकाम) | सदस्य |
| ६. | श्री. शरद नानेगांवकर, कार्यकारी अभियंता (पाणी पुरवठा) | सदस्य |
| ७. | श्रीम. कविता बोरकर, सहाय्यक आयुक्त (पर्यावरण) | सदस्य सचिव |

सदर बैठकीत १५ व्या वित्त आयोगातंर्गत संदर्भिय शासन निर्णयानुसार प्राप्त निधी रक्कम रु. १३.२५ कोटी खर्च करुन हवेची गुणवत्ता सुधारणेकरीता महानगरपालिकेच्या संबंधित अधिकारी वर्गाकडुन सविस्तर आढावा घेऊन परिशिष्ठ "अ" मध्ये नमूद केल्याप्रमाणे निधी खर्च करणेची कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

| **अ. क्र.** | **मुद्दा** | **विभागाकडुन सादर करण्यात आलेली माहिती** | **अंदाजपत्रकीय रक्कम (रु. कोटी)** | **संबंधित विभाग** |
|---|---|---|---|---|
| १. | हवेची गुणवत्ता सुधारणेसाठी हवा मोजणी यंत्र (CQMS) | ०१ नग | १.५० | पर्यावरण |
| २. | धूळ नियंत्रणासाठी मशीन – ट्रक्टर ट्रालीवर | ०१ नग | ०.४० | पर्यावरण |
| ३. | धूळ नियंत्रणासाठी मशीन – गाडीवर फिरती | ०१ नग | ०.६० | पर्यावरण |
| ४. | स्मशानभूमी / विद्युतवाहिनी | ०१ नग | १.७५ | बांधकाम / विद्युत |
| ५. | शहरात विविध ठिकाणी ट्राफिक बेटे / कारंजे / हिरवळ | ०५ ठिकाणी | १.५० | उद्यान / बांधकाम |
| ६. | इलेक्ट्रीक बस खरेदी | १३ नग | ६.०० | परिवहन |
| ७. | रस्ते सफाई मशीन - लहान (Mini Road Sweeping Machine) | ०३ नग | १.५० | पर्यावरण |
| | | **एकूण** | **१३.२५ कोटी** | |

महत्वाचे :-

१. उपरोक्तप्रमाणे बैठकीस दिलेल्या निर्देशानुसार ज्या विभागामार्फत संबंधित कामे करावयाची आहेत. त्या विभागांनी संबंधित कामाबाबतचे तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्याची उचित कार्यवाही दि. २५/०७/२०२२ पर्यंत पूर्ण करावी.

२. उपरोक्तप्रमाणे तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेतल्यानंतर तात्काळ संबंधित कामांची निविदा प्रपत्रे तयार करण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात यावी.

**(दिलीप ढोले)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**